(सीएनआर क्र.**MHRG**13000-143-2019)
कार्तिकी नरेश मोरे वि. नरेश विजय मोरे.

## नि.क्र.५ वर आदेश.

०१. सदर अर्ज अर्जदाराने अंतरिम पोटगीसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक १३/०५/२०१८ रोजी बौध्द धम्म रितीरिवाजाप्रमाणे मौजे दिघी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड या ठिकाणी संपन्न झाला. अर्जदार ही विवाहा पश्चात सामनेवाला यांचे बरोबर प्रथम मौजे खांडपाले, ता. माणगांव येथे गेली व त्यानंतर नालासोपारा मुंबई येथे गेली. विवाहा पश्चात दुस-या दिवशी प्रथेनुसार अर्जदार हिने माहेरी माघारी जाण्याविषयी सामनेवाला यास सांगितले असता सामनेवाला याने अर्जदार हिस नकार दिला व माहेरी गेलीस तर तुझे पाय तोडून ठेवीन अशी धमकी दिली. सदर प्रकारामुळे अर्जदार पुरती गांगरुन गेली.

०२. अर्जदार हिने पुढे कथन केले की, त्यानंतर तीन ते चार दिवसांनी अर्जदार हिचा भाऊ दिनेश जनार्दन कासारे हा अर्जदार हिस माहेरी नेण्याकरीता आला. त्यावेळी अर्जदार, सामनेवाला व सामनेवाला याची बहीण वर्षा विजय मोरे असे तिघेजण अर्जदाराच्या माहेरी आहे. त्यानंतर सामनेवाला हा अर्जदार व तिच्या कुटुंबियांशी विचित्र वर्तन करत होता. अर्जदार हिच्या बहीणीने प्रथेनुसार सामनेवाला

यांचे बुट लपवले असता सामनेवाला याने या क्षुल्लक गोष्टीवरुन देखील अर्जदारा बरोबर भांडण केले व तिच्या दोन कानशिलात लगावल्या. त्यानंतर सामनेवाला याने रागाने रुसुन स्वतःला खोलीत बंद करुन घेवून जेवण करण्यास देखील नकार दिला.

०३. अर्जदार हिने पुढे कथन केले की, त्यानंतर दुस–या दिवशी सामनेवाला व त्याची बहीण त्यांचे मुळगावी जाण्यास निघाले असता त्यांनी अर्जदार हिस सोबत येण्यास सांगितले. त्यावेळी अर्जदारी हिने, 'मी दोन दिवस माहेरी राहु का ?' अशी सामनेवाला याचेकडे विचारणा केली असता सामनेवाला याने अर्जदार हिचा हात पिळला व कानशिलात देखील मारले. सदरची बाब अर्जदार हिच्या मोठया मेहुण्याने पाहिला असता सामनेवाला याने त्यांना उलट उत्तर करुन बहीणीसह तेथून निघून गेला. त्यानंतर दुस–या दिवशी अर्जदार हिचे सासरे व मावस सासू हे दोघे अर्जदार हिस नेण्याकरीता तिच्या माहेरी आले असता अर्जदाराच्या भावाने झालेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. त्यावेळेस अर्जदाराच्या सास–यांनी त्यांची माफी मागितली. त्यानंतर अर्जदार ही सास–यां बरोबर सामनेवाला यांच्या घरी निघून गेली.

०४. अर्जदार हिने पुढे कथन केले की, त्यानंतर काही दिवसांनी अर्जदाराच्या सासरची माणसे मुंबई येथे गेले त्यावेळी सामनेवाला याच्या मावशीच्या मुलाचे लग्न असल्याने ते दोघे गावीच राहिले. त्यावेळी सामनेवाला याने अर्जदार हिस

मागे झालेल्या प्रकाराची आठवण काढून शिवीगाळ करुन मारहाण केली. अर्जदार हिने सामनेवाला याचे सोबत संबंध ठेवण्यास प्रतिकार केला असता सामनेवाला याने अर्जदार हिचा हात पिरगटून रात्री ०२.०० वाजता अर्जदार हिस घराबाहेर काढले. त्यावेळी अर्जदार हिने गयावया करुन पुन्हा घरात प्रवेश मिळविला.

०५. अर्जदार हिने पुढे कथन केले की, त्यानंतर अर्जदार व सामनेवाला हे मुंबईला नालासोपारा येथे गेले असता काही दिवस चांगले गेले. त्यानंतर सामनेवाला हा अर्जदार हिच्याशी क्षुल्लक कारणावरुन भांडण करत असे व मारहाण करत असे. अर्जदार हिने सामनेवाला यास मॅगी नुडल्स प्रथम न देता सामनेवाला यांच्या छोटया पुतण्यांना दिले यावरुन देखील सामनेवाला याने अर्जदार हिस मॅगीचा टोप फेकून मारला व दोन्ही पुतण्यांना देखील मारहाण केली.

०६. अर्जदार हिने पुढे कथन केले की, दिनांक १३/०६/२०१८ रोजी अर्जदार व सामनेवाला यांच्या विवाहास एक महिना झाल्याने सामनेवाला याच्या आईने अर्जदार हिस फिरावयास नेण्यास सांगितले. त्यावेळी सामनेवाला हा अर्जदार हिस हॉटेलमध्ये घेवून गेला. त्यावेळेस अर्जदार हिच्या मैत्रिणी प्रियंका व माधुरी यांचा अर्जदार हिस फोन आला असता, आताच यांचा का फोन आला, तू माझ्या सोबत खुश नाहीस का ? अशी विचारणा करुन हॉटेलमध्येच सामनेवाला याने अर्जदार हिस

शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व आई बहीणीवरुन अश्लील शिवीगाळ करुन फरफटत बाहेर नेले. अर्जदार हिने झालेला घरी आल्यावर तिच्या जावेस सांगितला. त्यावेळी जावेने अर्जदार हिस संयम बाळगण्यास सांगितले. त्याच दिवशी अर्जदार हिच्या भाच्याचा वाढदिवस असल्याने अर्जदार हिने रात्री १२.०० वाजता भाच्यास कॉल करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व त्याचा फोटो अपलोड केला म्हणून सामनेवाला याने अर्जदार हिचा फोन फेकून दिला व तिला मारहाण केली. तसेच अर्जदार हिचे मोठे मेहुणे अर्जदाराची तब्येत विचारण्याकरीता कधी तरी फोन करत असत त्यावरुन देखील सामनेवाला हा अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत असे व तिला अश्लील शिवीगाळ करुन मारहाण करत असे. तसेच अर्जदार हिने सामनेवाला याचे बरोबर संबंध ठेवण्यास नकार दिल्यास सामनेवाला हा अर्जदार हिच्या गळयावर सुरी लावीत असे व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत असे. सदरची बाब अर्जदार हिने घरातील लोकांना सांगितली असता अर्जदाराच्या सास-यांनी झाल्या प्रकारचा जाब सामनेवाला यास विचारला असता सामनेवाला याने त्यांना देखील मारहाण केली.

०७. अर्जदार हिने पुढे कथन केले की, अर्जदार हिच्या जावेने एके दिवशी सामनेवाला याचे पाच वर्षापुवी प्रांजल नावाच्या मुली बरोबर लग्न झाले असल्याचे अर्जदार हिस सांगितले. त्यावेळी सदर गोष्टीचा जाब विचारण्याची हिंमत अर्जदार हिची

झाली नाही. तसेच सामनेवाला हा जेवण शिल्लक राहिले अथवा कमी पडले तरी अर्जदार हिस मारहाण करत असे. तसेच सामनेवाला हा रात्री अपरात्री कधीही जाग आल्यावर जेवण संपले आहे हे माहित असून देखील अर्जदार हिच्याकडे जेवायला मागत असे. अर्जदार हिने त्यावेळी जेवण संपल्याचे सांगितले असता सामनेवाला याने अर्जदार हिस मारहाण केली. त्यावेळी अर्जदाराने शिल्लक असलेले जेवण वाढले असता सामनेवाला याने दोन घास खावून उर्वरित सर्व जेवण किचनमध्ये फेकून दिले. त्यानंतर सामनेवाला याने अर्जदार हिस शिवीगाळ करुन गुप्तांगावर मारहाण केली. त्यानंतर अर्जदार हिने तिच्या जावेकडून पैसे घेवून तिच्या वहिनीकडे विरार येथे गेली. त्यावेळी अर्जदार हिने तिच्या भावास फोन करुन झालेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर दिनांक १६/११/२०१८ रोजी अर्जदार हिचा भाउ व गावातील काही कार्यकर्ते व नातेवाईक मुंबई येथे आले. त्यानंतर अर्जदाराने त्यांच्या सोबत जावून पोलीस स्टेशनला तक्रार केली.

०८. अर्जदार हिने पुढे कथन केले की, त्यानंतर दिनांक २३ नोव्हेंबर रोजी समाजाची मिटींग बसली असता अर्जदार हिने झालेला प्रकार सविस्तर कथन केला. त्यावेळी सर्वांनी अर्जदाराच्या सासरच्या मंडळीशी संपर्क साधून सदर प्रकरण सामंजस्याने सोडवण्याचा प्रयत्न केला असता सामनेवाला कोणाचेही ऐकण्यास तयार

नव्हता. अर्जदाराचे नातेवाईक सामंजस्याची बोलणी करण्यासाठी सामनेवाला यांच्या घरी गेले असता सामनेवाला यांनी त्यांना घरातून हाकलून दिले. त्यानंतर सामनेवाला याच्याशी अनेक वेळा संपर्क करुन प्रकरण मिटवण्याची विनंती केली असता सामनेवाला याने तडजोड घडू दिली नाही.

०९. अर्जदार हिने पुढे कथन केले की, सामनेवाला याने अर्जदार हिस घरात कोंडून जिवे मारण्याचा प्रयत्न केला तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी भावाच्या घरी राहत आहे.

१०. अर्जदार ही सदयस्थितीत आर्थिक दृष्टया पुर्णतः भावंडावर अवलंबून असून कोणतीही नोकरी अथवा व्यवसाय करत नाही. अर्जदार हिच्या भावांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने व अर्जदार हिच्या विवाहाकरीता मोठया प्रमाणात कर्ज काढावे लागल्याने अर्जदार हिस दैनंदिन जीवन जगणे कष्टप्राय होत आहे. तसेच सामनेवाला याच्यावर अर्जदार हिच्या व्यतिरिक्त अन्य कोणाचीही जबाबदारी नसल्याचे कथन अर्जदार हिने केले आहे. सामनेवाला यास एक भाउ असून तो त्याचा संसार करत आहे व सामनेवाला याचे आई वडील देखील स्वतः कमवून गुजराण करत आहेत. सामनेवाला हा मुंबई येथे खाजगी कंपनीत चांगल्या पगारावर नोकरीस असून त्याला दरमहा रुपये तीस हजार इतका पगार मिळतो. तसेच

सामनेवाला यांची मौजे खांडपाले, ता. माणगांव, जि. रायगड येथे शेत जमीन व घर मिळकत आहे. सदर शेत जमिनीतून वर्षाकाठी अंदाजे दोन ते तीन लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. सामनेवाला याचेवर अर्जदार हिच्या व्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अर्जदार हिने अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत पालनपोषणाकरीता दरमहा १५,०००/– रुपये मिळावे अशी विनंती केली आहे.

११. सामनेवाला याने सदर अर्जावर नि.क्र.१२ कडे म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, लग्न झाल्यानंतर अर्जदार दोन तीन महिने चांगली वागल्यानंतर छोटया छोटया घरगुती विषयांवरुन वाद उपस्थित करुन सामनेवालाशी वाद करत असे. परंतु तिच्या सासु सास–यांशी वाद करत नव्हती. तसेच ''तुझे कोणाशी तरी लफडे आहे, तु बाहेरख्याली आहेस, ही प्रांजल कोण आहे ते मला सांग, नाही तर माझ्याशी गाठ आहे' असे म्हणून अर्जदार ही सामनेवाला याच्या चारित्र्यावर संशय घेवू लागली. त्यावेळी सामनेवाला याने अर्जदाराला समजावण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदार हिने सामनेवालाच्या चारित्र्यावर संशय घेणे कायम ठेवले व तिने स्वतःच्या मर्जीने सामनेवालाचे घर सोडून निघून गेली.

१२. सामनेवाला याने पुढे कथन केले की, त्यानंतर सामनेवाला यांनी

अर्जदार हिस पुन्हा नांदण्यास आणल्यानंतर अर्जदार ही खिडकीची काच साफ करत असताना सामनेवाला याने तिला व्यवस्थित खिडकी पुसून घे, खुप कचरा साठला आहे असे म्हणाला असता अर्जदार हिने सामनेवाला यास जास्त शहाणपणा करु नकोस, नाही तर तुझ्या कानाखाली आवाज काढेन असे घरातील लोकांसमोर बोलली.

१३. सामनेवाला याने पुढे कथन केले की, सप्टेंबर २०१८ मध्ये घरातील काही सदस्यांना बनवलेले जेवण कमी पडल्याने सामनेवाला याने अर्जदारास तुला जेवणाचा अंदाज येत नसेल तर माझ्या आईकडून हळूहळू शिकून घे, जरी आईची ॲन्जोप्लास्टी झाली असली तरी ती तुला मुली सारखी शिकवेल, असे समजावून सांगितले. त्यावेळी अर्जदार हिला भयंकर राग आलेने घरात कोणासही न सांगता अचानक स्वमर्जीने कुठे तरी निघून गेली. त्यानंतर सामनेवाला याने अर्जदाराच्या प्रत्येक नातेवाईकांकडे अर्जदाराचा शोध घेतला असता अर्जदार कुठेही मिळून आली नाही. त्यामुळे सामनेवाला याने २४ तासानंतर अर्जदार हरवल्याची तक्रार पोलीस स्टेशनला देण्याचे ठरवले. त्याच वेळी सामनेवाला यास पोलीस ठाण्यातून फोन आला की, 'तुमच्या पत्नीने तुमच्या विरुध्द आमच्याकडे तक्रार दिलेली आहे तात्काळ पोलीस स्टेशनला या'. त्यानुसार सामनेवाला नालासोपारा पोलीस स्टेशन येथे हजर

झाला. त्यावेळी सामनेवाला यास पोलीस अधिका–याच्या ॲन्टी चेंबरमध्ये चौकशीसाठी घेतले असता अर्जदार ही काही न सांगता स्वमर्जीने माहेरी मौजे दिघी, ता. श्रीवर्धन येथे तिचा भाऊ दिनेश व वहिणी अर्चना यांच्या सोबत निघून गेली. त्यावेळी सामनेवाला याने पोलिसांना अर्जदाराने नेमकी तक्रार काय दिलेली आहे याबाबत विचारले असता पोलिसांनी त्यास सांगितले की, तुम्ही शरीर सुख घेताना जोरजबरदस्ती करता म्हणून तिला तुमच्याकडे रहायचे नाही. अशा प्रकारच्या खोटया तक्रारी अर्जदाराने या आधीही केल्याचे सामनेवाला यास दिसून आल्याचे कथन सामनेवाला याने केले आहे.

१४. सामनेवाला याने पुढे कथन केले की, अर्जदार माहेरी निघून गेल्यानंतर सामनेवाला याने तिला आणण्यासाठी बरेच प्रयत्न केले. तसेच दिनांक ०९/१०/२०१८ रोजी नालासोपारा पोलीस स्टेशन अंतर्गत तुळीज पोलीस चौकी येथे आपल्या पत्नीला आपल्या संमती विना माहेरची लोक घेवून गेली अशी तक्रार दिली असता तेथील पोलीस अधिकारी ए.एस.आय. म्हात्रे यांनी सामनेवाला यास त्याने दाखल केलेली तक्रार अदखलपात्र स्वरुपाची असल्याने तुम्ही परस्पर वसई न्यायालयात दाद मागा असे सांगितले.

१५. सामनेवाला याने पुढे कथन केले की, अर्जदार हिने सामनेवाला यास

दाद न देता समाज संघटना बौध्दजन पंचायत समिती, दिवा विभाग, श्रीवर्धन यांच्याकडे तक्रार केली. त्यामुळे सदर संघटनेने सामनेवाला ज्या संघटनेचे अंकीत आहेत अशा बौध्दजन सेवा संघ गोरेगांव यांना पत्र पाठवून सामनेवाला यास सभेसाठी बोलावून घेतले. त्यानुसार दिनांक २३/११/२०१८ रोजी सामनेवालाा व त्यांच्या घरातील चार पाच व्यक्ती व बौध्दजन सेवा संघ गोरेगांवचे चार पाच कार्यकर्ते असे बोर्ली हायस्कुल, ता. श्रीवर्धन येथे सभेसाठी हजर झाले व अर्जदार व तिचे नातेवाईक देखील हजर झाले होते. त्यावेळी सदर सभेमध्ये सर्व समंजसपणे पार पडले व सामनेवाला अर्जदारास नांदायला घेवून जाण्यास तयार झाला. त्यावेळी अर्जदार हिने हातातून हिरवा चुडा (बांगडी) काढून सामनेवाला याचेवर भिरकावली व मला तुझ्या बरोबर नांदायला यायचे नाही असे म्हणाली. त्यावेळी अर्जदार हिचा भाऊ दिनेश कासारे म्हणाला की, 'लग्नाला झालेला खर्च रक्कम रुपये सहा लाख भरुन दया अन्यथा ठार मारुन टाकू.' त्यावेळी अर्जदारा सोबत आलेल्या तिच्या ४० ते ५० नातेवाईकांनी सामनेवाला व त्याच्या कुटुंबियावर अचानक जिवघेणा हल्ला केला. तसेच सामनेवाला याच्या गळयातील सोनसाखळी हिसकावून घेवून गेले. सदर मारहाणीमुळे सामनेवाला यास, त्याची आई, वडील, भाउ यांना दुखापती झाल्या. त्यानंतर सामनेवाला त्याच्या कुटुंबासह निघून गेला.

१६. सामनेवाला याने पुढे कथन केले की, सामनेवाला यास अर्जदार हिस नांदवण्याची प्रामाणिक इच्छा असल्याने अर्जदार हिस मोबाईल संपर्क साधला असता अर्जदार जाणीवपुर्वक तो फोन उचलत नसे व सामनेवाला यास कोणताही प्रतिसाद देत नसे. त्यामुळे सामनेवाला याने दिनांक ०६/१२/२०१८ रोजी त्यांचे वकिलामार्फत नोटीस पाठवून सन्मानाने नांदायला येण्याची विनंती केली. सदर नोटीस प्राप्त होवून देखील अर्जदार सामनेवाला याचेकडे नांदावयास आली नाही व नोटीसही उत्तर दिले नाही. त्यामुळे सामनेवाला याने पुन्हा दिनांक १८/०३/२०१९ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून सन्मानाने नांदण्यास येण्याची विनंती केली. तरी देखील अर्जदार सामनेवाला याचेकडे नांदण्यास आली नाही.

१७. सामनेवाला याने पुढे कथन केले की, सामनेवालाचे शिक्षण केवळ आठवी पास असून अर्जदार कला शाखेची पदवीधर आहे. तसेच तिने कॉम्प्युटर कोर्स पुर्ण केलेला आहे. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला पेक्षा उत्पन्न कमवण्यास सक्षम आहे. तसेच सामनेवाला हा कोणत्याही खाजगी कंपनीत कामाला नसून त्यास तीस हजार रुपये पगार नाही. तसेच सामनेवाला यास शेतीपासून कोणतेही उत्पन्न नाही व त्याची कोणतीही शेती नाही. तसेच सामनेवाला कोणताही कामधंदा करत नाही. सामनेवाला याने पुढे कथन केले की, अर्जदार ही पदवीधर असल्याने तिला उत्पन्नाचे

साधन निर्माण करता येणे सहज शक्य आहे. तसेच अर्जदाराचे माहेर श्रीमंत असून तिच्या भावाचे दारुचे धंदे असल्याने अर्जदार हिची कोणतीही गैरसोय झालेली नाही. सामनेवाला याने पुढे कथन केले की, सामनेवाला याचे आई वडील वयोवृध्द असून त्यांना सांभाळण्याची जबाबदारी त्याची आहे. तसेच अर्जदार हिने स्वमर्जीने सामनेवालाचा त्याग केला असल्याने व सामनेवाला यांनी कोणतेही कौटुंबिक हिंसाचार केलेले नसल्याने व कोणतेही कारण घडले नसल्याने सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

१८. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील कथने ही शपथपत्रावर दाखल केलेली आहे. अर्जदार ही सामनेवाला यांच्या पासून विभक्त राहत असलेने प्रथमदर्शनी तिचा पुरावा ग्राहय धरणे योग्य वाटते. प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला यांनी अर्जदार व तिचे भावा विरुध्द तुळीज पोलीस ठाणे येथे दिनांक ०९/१०/२०१८ रोजी शिवीगाळ व दमदाटी केली म्हणून अदखलपात्र गुन्हयाची तक्रार केलेली आहे. तसेच अर्जदार ही नांदावयास येण्याकरीता दिनांक १५/१०/२०१९ रोजी महाड येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात एच एम पी नं.२४७/२०१९ हा विवाह हक्क प्रस्थापनेसाठी अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरचा अर्ज हा प्रस्तुतचे प्रकरण प्रलंबित असताना

दाखल केला असून त्याबाबत प्रकरणाच्या या टप्प्यावर विचार करता येणार नाही. या प्रकरणी दाखल केलेला अदखलपात्र गुन्हा हा दोन्ही पक्षातील वाद दर्शवत असून त्यावरुन सदयस्थिती अर्जदारा विरुध्द कोणतेही मत नोंदवता येणार नाही. या प्रकरणी अर्जदार हिने बौध्दजन पंचायत समिती यांचे समोर झालेल्या सभेचे इतिवृत्त दाखल केले आहे. तथापि, सदर सभेचे इतिवृत्त हे त्यातील साक्षीदारांना तपासल्याशिवाय प्रथमदर्शनी केससाठी देखील ग्राहय धरणे योग्य होणार नाही. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराचे शपथेवरील कथने पाहता तिचा सामनेवाला यांनी शारीरिक तसेच मानसिक स्वरुपाचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळेच अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जाचा विचार करणे आवश्यक आहे.

१९. यातील सामनेवाला याचे किती उत्पन्न आहे हे दाखवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नसलेने त्यांच्या कथनाप्रमाणे सामनेवालाचे मासीक उत्पन्न ३० हजार रुपये व इतर वार्षिक २ ते ३ लाख रुपये उत्पन्न असल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही. तथापि, सामनेवाला हा एक ३० वर्षाचा तरुण असलेने तो मासीक उत्पन्न किमान रुपये १५ हजार इतके उत्पन्न मिळवत असल्याचा निष्कर्ष काढता येईल. यातील सामनेवाला क्र.१ याचे मासीक उत्पन्न रुपये १५ हजार गृहित धरले असता तसेच वेळोवेळी मा. सर्वोच्च न्यायालय व विविध मा. उच्च न्यायालय

यांच्या न्यायनिर्णयातून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा विचार केला असता गृहित धरलेल्या पोटगी रकमेच्या १/३ इतकी रक्कम पोटगी पोटी देणे आवश्यक आहे. अर्जदार व सामनेवाला यांची अभिलेखावरील परिस्थिती पाहता अर्जदार हिला उदर निर्वाहाकरीता, औषधोपचाराकरीता मासीक रुपये पाच हजार इतकी पोटगी मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.५ कडील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

०२. सामनेवाला याने अर्जदार हिस मासीक रुपये ५०००/- असे अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगीपोटी प्रकरणाचे अंतिम निकालापर्यंत दयावी.

०३. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )
दिनांक – २९/११/२०१९. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.